# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत मान्सूनपूर्व सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्याकरिता मा. आयुक्त ॲक्शन मोड वर**

- **शहरात पूरसदृश्य परिस्थिती टाळण्यासाठी महापालिकेचे विशेष प्रयत्न सुरू**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने मान्सूनपूर्व कामे युद्ध पातळीवर सुरू असून मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी दिनांक 08 जून 2024 रोजी शहरात विविध ठिकाणी सुरू असलेल्या कामाचा पाहणी करून आढावा घेतला. पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त कल्पिता पिंपळे, शहर अभियंता दिपक खांबीत, कार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंता व महापालिका स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

शहरातील विविध भागातील नालेसफाई कामांची पाहणी, तसेच पाणी साठणाऱ्या संभाव्य ठिकाणांची पाहणी, सीसी रस्त्यांची कामे, वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत सुरू असलेली फांद्यांच्या छाटणीची पाहणी केली. पावसाच्या पाण्याचा त्वरीत निचरा होईल आणि रस्ते जलमय होणार नाहीत याची खबरदारी घ्यावी, तसेच ड्रेनेज व पाणी पुरवठा विभागाची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत, अशा सूचना त्यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. पावसाळयात पाणी साचणे टाळण्यासाठी, पुराचा धोका कमी करण्यासाठी, झाडांच्या धोकादायक फांद्या रस्त्यावर पडून अपघात टाळण्यासाठी, तसेच डासांचा प्रादुर्भाव कमी करून सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी महापालिकेमार्फत मान्सूनपूर्व विविध कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. पूरसदृश्य परिस्थिती टाळण्यासाठी पावसाळ्यात जमा होणाऱ्या कचऱ्याचा योग्य निचरा होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांनी आपल्याजवळ जमा होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावावी, असे आवाहन मा. आयुक्त महोदयांनी केले आहे. मिरा भाईंदर शहराला स्वच्छ व निरोगी राखण्यासाठी नागरिकांचे सहकार्य व सहभाग अपेक्षित आहे. नागरिकांनी स्वच्छता विषयक नियमांचे व आवश्यक सूचनांचे पालन करून महानगरपालिकेस सहकार्य करावे.